# मुंबई विद्यापीठ

प्रकाशन विभाग
प्र.वि/आयसाडी/२०२१–२२/
कक्ष क्र. २२१,
मुंबई – ४०० ०३२.
दिनांक :– २१ सप्टेंबर, २०२१

**परिपत्रक :**
**विद्यापीठातील शैक्षणिक विभागातील विभाग प्रमुख आणि संचालक**

**विषय : विद्यापीठाचे सन २०२०–२१ या वर्षाचे वार्षिक अहवाल तयार करण्यासाठी (कालावधी : १ एप्रिल २०२० ते ३१ मार्च २०२१) माहिती पाठविण्याबाबत.**

विद्यापीठाचे सर्व विभागांचे विभाग प्रमुख संचालक/, सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, संचालक, ज्ञान स्त्रोत केंद्र, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, स्थानापन्न वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, स्थानापन्न नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागाचे/कक्षांचे प्रमुख यांना कळविण्यात येते की, विद्यापीठाचे सन २०२०–२१ या वर्षाचे वार्षिक अहवाल तयार करण्यासाठी मा. प्र–कुलगुरू महोदयांनी समितीचे गठन केलेले आहे. त्याचबरोबर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ नुसार

**कलम १३६ (१)** : 'अधिष्ठाता मंडळ, प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी विद्यापीठ त्याच्या अधिकारितेतील महाविद्यालये व परिसंस्था यांचे प्रशासनिक, विद्याविषयक संशोधन व विकासविषयक व अन्य कार्यक्रम समाविष्ट असलेला वार्षिक अहवाल तयार करील व तो विचारार्थ व्यवस्थापन परिषदेला सादर करील. व्यवस्थापन परिषदेकडून मिळालेल्या वार्षिक अहवालावर अधिसभा चर्चा करील व तो मान्य करील. अधिसभेने मान्य केलेला असा अहवाल, कुलपती व राज्य शासन यांना शैक्षणिक वर्ष संपल्यानंतर एका वर्षाच्या आत सादर करण्यात येईल.'

**कलम १३६ (२)** : '(२) राज्य शासन, तो वार्षिक अहवाल राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे मांडण्याची व्यवस्था करील'

यानुसार आपणांस विनंती करण्यात येत आहे. शैक्षणिक वर्ष २०२०–२१ या वर्षाकरिता विद्यापीठाचे वार्षिक अहवाल तयार करण्यासाठी आपल्या विभागांशी संबंधित माहिती पाठवावी.

सदर माहिती मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषांमध्ये देणे बंधनकारक आहे याची कृपया नोंद घ्यावी.

वार्षिक अहवाल मराठी व इंग्रजी मध्ये तयार केले जाणार आहे. माहिती दिनांक १ एप्रिल २०२० ते ३१ मार्च २०२१, या काळातील असावी. माहिती पाठविताना कृपया खालील बाबींचे अवलोकन व्हावे.

१) सन २०२०–२१ या वर्षात विभागाने/संस्थेने देशाच्या औद्योगिक, आर्थिक आणि सामाजिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरलेले तसेच ज्ञानक्षेत्रात लक्षणीय भर घालणारे अशा स्वरूपाचे जे विशेष उल्लेखनीय कार्य केले असेल त्याचा उल्लेख करावा. तसेच विभागाने संशोधनाचे जे विशेष प्रकल्प हाती घेतले असतील त्यांचाही उल्लेख येथे करावा.

| दिनांक | उपक्रमाचे नाव | संस्था |
|---|---|---|

२) सन २०२०–२१ या वर्षात विद्यापीठ मान्यताप्राप्त संस्था व विभागाद्वारे नाविन्यपूर्ण उपक्रम, संशोधन, पेटंट, कन्सलटन्सी, इत्यादी स्वरूपातील माहिती पाठवावी. राष्ट्रीय –आंतरराष्ट्रीय, युजीसी मान्याताप्राप्त जर्नल्स मध्ये प्रकाशित झालेले शोधनिबंध यांचा समावेश करण्यात यावा.

| अ. क्र. | महाविद्यालय/ संस्थाचे नाव | शिक्षकाचे नाव व पदनाम | प्रकाशित झालेले शोधनिबंध/ पेटंट/ पुस्तके/ प्रकाशन/ कन्सलटन्सी, **(उदा. ०२ पेटंट, ०१ शोधनिंबंध) या प्रमाणे फक्त संख्या लिहावी)** | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | प्रकाशित झालेले शोधनिबंध | पेटंट | पुस्तके | प्रकाशन | कन्सलटन्सी |

३) सन २०२०–२१ या वर्षात मंजूर झालेले प्रकल्प, अध्यासन, विविध योजना, रक्कम, मंजूर झालेली अनुदान (शासकीय/निमशासकीय), नामांकित संस्थेकडुन प्राप्त झालेले अनुदान, यांचा समावेश करण्यात यावा.

| अ.क्र. | महाविद्यालय / संस्थाचे नाव | मंजूर झालेले अनुदान/संशोधन पायाभूत | शासकीय/ बिगर शासकीय |
|---|---|---|---|

४) संशोधन केंद्राबदद्लची माहिती (सन २०२०–२१)

| अ. क्र. | विभागाचे नाव | पी.एच.डी. गाईड नाव | विषय | प्रवेश क्षमता | झालेले प्रवेश |
|---|---|---|---|---|---|

५) अनुदानाबदद्लची माहिती (सन २०२०–२१)

| अ.क्र. | विभागाचे नाव | मंजूर झालेले अनुदान/संशोधन पायाभूत | शासकीय | बिगर शासकीय |
|---|---|---|---|---|

<u>सुचना:</u>

१. माहिती फक्त ई–मेल द्वारे स्वीकारण्यात येईल. त्यासाठीचा ई–मेल आयडी पुढीलप्रमाणे :– **fortpublication@gmail.com**
२. माहिती पाठविताना मराठी साठी– कृतीदेव ५०/ Font size– १६ व इंग्रजीसाठी Times New Roman, Font size– १४ Word File मध्ये पाठवावी.
३. माहिती पाठवितांना ती SOFT COPY मध्येच पाठवावी. HARD COPY स्वीकारण्यात येणार नाही
४. कृपया माहिती दिनांक ७ ऑक्टोबर, २०२१ पर्यंत पाठवावी. (माहिती फक्त ई–मेलद्वारे स्वीकारण्यात येईल कृपया याची सर्वांनी नोंद घ्यावी)
५. सदर परिपत्रक मुंबई विद्यापीठाच्या www.mu.ac.in – या संकेतस्थळावरील Circular Link अंतर्गत Publication Section येथे उपलब्ध करून देण्यात आले आहे.

मुंबई ४०० ०३२
दिनांक २१ सप्टेंबर, २०२१

डॉ. बळीराम गायकवाड
(प्र. कुलसचिव)